**MHAH180016642022**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४५९/२०२२ मधील</u>**
**<u>आदेश नि.क्र.१४</u>**

*नंदराज दत्तात्रय पावसे* ... *वादी*
*विरूध्द*
*गोकुळ दत्तात्रय पावसे* ... *प्रतिवादी*

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२) वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरूध्द निरंतर ताकीद मनाई हुकूम आणि जाहिर ठरावासाठी दाखल केला आहे. त्याचप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे. सदरचा दावा दाखल असल्याची माहिती प्रतिवादीस माहिती झाली त्याचप्रमाणे प्रतिवादी विरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा नांदविण्यास गेला असल्याचे माहिती प्रतवादीस मिळाली. त्याचप्रमाणे दाव्याचे कामकाज चालु आहे अशी सर्व परिस्थीती असताना केवळ वादीचे नुकसान करण्याचे व दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण करण्याचे हेतुने दाव्यातील प्रतिवादीने दावा मिळकत मौजे कणगर बुा़ येथील शेतजमिन दावा मिळकत गट नं. ३४६/२ क्षेत्र ०१-६२ आर इतके क्षेत्र त्यापैकी वादीचे नावे राहुरी यथील मा. तहसिलदार यांचे समोर क्र. कावि/वाटप/एस आर नं. ७४/२०१७ चे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम क्र. ८५ नुसार ८१ आर पोट खराबा ०० हे ०१ आर (गुंठा) इतके प्रत्येक वादी व प्रतिवादी यांना देववि्ण्यात आली आहे व दावा मिळकतीवर आज ही वादीचा ताबा कब्जा आहे.

३) वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादीने सर्व परिस्थीती माहिती असुन ही प्रतिवादीने दि. २५/०७/२०२२ रोजी दावा मिळकतीचे क्षेत्र श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांना कायम खरेदी खतान्वये दुय्यम निबंधक यांचे समोर खरेदी दिले आहे. प्रतिवादी व श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांच्यामध्ये झालेला व्यवहार हा बोगस, बिनकब्जाचा व बेकायदेशीर असुन तो वादीवर बंधनकारक नाही. म्हणुन, वादीने प्रस्तुत अर्जात कथन केल्याप्रमाणे दुरूस्ती करणे न्यायाचे कामी व वादीचे हिताचे दृष्टीने गरजेचे आहे. त्या अनुषंगाने वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्यात न्यायनिवाडा करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण येणार नाही. सबब वादीने दावा दुरूस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

४) प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. १९ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये, सदर मिळकतीशी वादी यांचा कोणताही संबंध नाही, दावा मिळकत ही प्रतिवादी यांना त्यांचे वडीलांनी त्यांचे हयातीत स्वतंत्ररित्या दिलेली अशी मिळकत आहे. त्याप्रमाणे सदरची मिळकत प्रतिवादीचे कब्जात व ताब्यात होती. दरम्यान वादी यांनी लबाडीने प्रतिवादी यांचे अपरोक्ष सदर मिळकतीशी वादीचा कोणताही संबंध नसतानाही मे. तहसिलदार, राहुरी यांचेकडे कलम ८५ प्रमाणे वाटपासाठी अर्ज देवुन सदर मिळकतीपैकी ० हे ८१ आर अधिक पोट खराबा ० हे ०१ आर स्वत:चे नावे करून घेतलेले होते. त्यांची माहिती प्रतिवादी यांना झाल्यानंतर प्रतिवादी यांनी वादी विरूध्द फसवणुकीची तक्रार करणार असल्याची समज वादीस दिल्याने वादी यांनी पुन्हा तहसिलदार, राहुरी यांचेकडे अर्ज देवुन तसेच प्रतिज्ञापत्र सादर करून सदर मिळकतीचे संपुर्ण क्षेत्र प्रतिवादी यांचे नावावर पुर्ववत करून दिलेले आहे. सदर मिळकत प्रतिवादी यांस तो अज्ञान असताना वडीलांनी स्वतंत्ररित्या दिलेली असुन

प्रतिवादी हा सज्ञान झाल्यापासुन सदर मिळकतीत प्रतिवादी यांची मालकी व वहिवाट होती. असे असताना केवळ सदरची मिळक्त गिळकृत करण्यासाठी वादी यांनी खोटया व बनावट तक्रारी करून सदरचा दावा केलेला आहे.

५) प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दरम्यान प्रतिवादी यांचे त्याचे आर्थिक अडचणीसाठी सदरची दावा मिळकतीपैकी उत्तर बाजुकडील ० हे ८० आर क्षेत्र रामेश्वर बापुसाहेब कदम यांना दि. २५/०७/२०२२ रोजी रजिस्टर खरेदीखताने खरेदी देवुन त्यांचे प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात दिलेली आहे व मिळकतीपैकी उर्वरीत क्षेत्र हे प्रतिवादी यांचे ताब्यात असुन वादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसल्याने वादी यांना अशा प्रकारे दुरूस्तीचा अर्ज देवुन दुरूस्ती करून मागण्याचा कायदयाने मुळीच हक्क व अधिकार नाही. वादी यांचे अर्जाप्रमाणे दुरूस्ती झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. दुरूस्ती झाल्यास मुळ दाव्याचे स्वरूपच बदलुन जाणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत रद्द करण्याची विनंती केली आहे.

६) वादी व प्रतिवादीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला.

७) अर्ज व म्हणण्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तावित दुरूस्ती ही औपचारिक स्वरूपाची आहे. प्रस्तुत प्रकरणात मुद्दे अजून गठीत झालेले नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर चालविण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. त्यामुळे, वर नमुद केलेल्या कारणामुळे दाव्याचे स्वरूप पाहता प्रस्तावित दुरूस्ती गरजेची वाटते.

८) वर नमुद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदरचे

विशोधन दाव्याचे अंतिम निर्णयासाठी इष्ट व आवश्यक असल्याने न्यायाचे हेतुस्तव पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाचे आत दुरूस्ती करावी व त्याच कालावधीत दाव्याची विशोधित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**राहुरी**
**दिनांक :- ०२.०९.२०२३**

**(सौ. आर. एस. तापडीया)**
**सह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, राहुरी**